दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

■ आरएनआय : MAHMAR/2021/85884 — रविवार, दि. १९ एप्रिल, २०२६ — ■ वर्ष - १ ■ अंक - २०४ ■ पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

रविवार दि. १९ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, द्वितीया सकाळी १०-५० पर्यंत नंतर तृतीया तिथी दिवस नक्षत्र– भरणी सकाळी ७-१० पर्यंत चंद्र रास- मेष दुपारी १२३१ पर्यंत नंतर वृषभ, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

### सहकार क्षेत्राला चालना

**पुणे**: महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या संचालक मंडळ कार्यालयाच्या उद्‌घाटन कार्यक्रमात मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. सहकार क्षेत्राची ताकद वाढवण्यासाठी आणि कुशल नेतृत्व घडवण्यासाठी सर्व विद्यापीठांमध्ये स्वतंत्र सहकार विभाग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले. प्रशिक्षण निधी पुन्हा सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव पावसाळी अधिवेशनात मांडला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## सारांश वृत्त

### विरोधकांचा चेहरा उघडा पडला

**शिमला** : हिमाचल प्रदेश विधानसभेतील विरोधी पक्षनेते जयराम ठाकूर यांनी शनिवारी महिला आरक्षण कायदा दुरुस्ती विधेयक पराभूत झाल्याबद्दल कॉंग्रेसवर टीका केली आणि म्हटले की यामुळे विरोधी पक्षांची महिलाविरोधी भूमिका उघड झाली आहे आणि महिलांना त्यांचे घटनात्मक अधिकार देण्यास आम्ही पाठिंबा देत नसल्याचे स्पष्ट केले आहे. हा फक्त महिलांवर अन्याय नाही, तर अक्षम्य गुन्हा आहे.

### भाजपचे धर्माच्या आधारावर ध्रुवीकरण

**कोलकाता** : झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी शनिवारी भाजपवर धर्माच्या आधारावर लोकांचे ध्रुवीकरण होत असल्याचा आरोप केला आणि महिलांवरील अत्याचार वाढत असताना महिलांच्या हक्कांसाठी भाजप मगरीचे अश्रू ढाळत असल्याचा आरोप केला. तृणमूल कॉंग्रेसच्या उमेदवाराच्या समर्थनार्थ पुरुलियातील काशीपूर येथे झालेल्या सभेत बोलताना सोरेन म्हणाले की, नरेंद्र मोदी सरकार महिला आरक्षणासाठी मगर अश्रू ढाळत आहे, तर भाजपशासित राज्यांमध्ये महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी काहीही केले नाही.

### मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवणार?

**नवी दिल्ली** : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवण्याची मागणी विरोधी पक्ष करत आहेत, अशी माहिती सूत्रांनी शनिवारी दिली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक विरोधी पक्षांचे नेते चर्चेत आहेत आणि कॉंग्रेससह टीएमसी, सपा आणि द्रमुकसह विविध पक्षांचे खासदार पदावरून हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी नवीन नोटीस तयार करण्याचे काम करत आहेत.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कॉंग्रेससह टीएमसी, द्रमुकवर घणाघात

# विरोधकांना पापाची शिक्षा मिळणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मंजूर न झाल्यानंतर राजकीय वातावरण तापले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करत कॉंग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांवर तीव्र टीका केली. महिला सक्षमीकरणाच्या मार्गात अडथळे निर्माण करून विरोधकांनी 'नारी शक्ती'चा विश्वासघात केल्याचा आरोप त्यांनी केला.

पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, 'नारी शक्ती वंदन' दुरुस्ती ही केवळ कायदेशीर बदल नसून देशाच्या सामाजिक आणि राजकीय रचनेत महिलांना समान स्थान देण्याचा व्यापक प्रयत्न होता. या दुरुस्तीचा उद्देश कोणत्याही राज्याचे किंवा समाजघटकाचे नुकसान करणे नसून, महिलांना दीर्घकाळापासून प्रलंबित असलेले प्रतिनिधित्वाचे हक्क देणे हा होता, असे त्यांनी सांगितले.

२०२९ नंतरच्या लोकसभा निवडणुकांपासून महिला आरक्षणाची अंमलबजावणी सुरू होईल, अशी भूमिका सरकारने मांडली होती. या पार्श्वभूमीवर लोकसभेची जागा वाढवणे आणि मतदारसंघ पुनर्रचना (परिसीमन) यासारखे मुद्देही या प्रक्रियेशी जोडले गेले होते. मात्र, याच मुद्द्यांवरून विरोधकांनी आक्षेप घेतल्याचे मोदी यांनी नमूद केले.

विरोधकांवर आरोप करताना पंतप्रधान म्हणाले की, कॉंग्रेससह इतर पक्षांनी महिला आरक्षण रोखण्यासाठी विविध युक्त्या केल्या. "कधी आकडेवारीवर प्रश्न उपस्थित केले, तर कधी चुकीची माहिती पसरवली. देशाला दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाला," असे ते म्हणाले. कॉंग्रेस, तृणमूल कॉंग्रेस, समाजवादी पक्ष आणि द्रमुक या पक्षांनी महिलांच्या हक्कांवर घाला घातल्याचा आरोपही त्यांनी केला. मतदारसंघ पुनर्रचनेबाबतही विरोधकांकडून गैरसमज पसरवले जात असल्याचे सांगत मोदी यांनी स्पष्ट केले की, परिसीमनाचा उद्देश सर्व राज्यांचे प्रतिनिधित्व संतुलित करणे हा होता. समाजवादी पक्षावर टीका करताना त्यांनी राम मनोहर लोहिया यांच्या विचारांनाही विरोधकांनी तिलांजली दिल्याचा आरोप केला. तसेच, विरोधकांनी या विधेयकाला राजकीय रंग देत मूळ मुद्दा बाजूला ढकलल्याचेही ते म्हणाले. विधेयक मंजूर न झाल्याबद्दल खंत व्यक्त करत पंतप्रधानांनी देशातील महिलांची माफी मागितली. "सरकारने प्रामाणिक प्रयत्न केले, मात्र अपेक्षित बहुमत मिळू शकले नाही. याबद्दल मी देशातील माता, भगिनी आणि कन्यांची क्षमा मागतो," असे त्यांनी सांगितले.

तंत्रज्ञान आणि सोशल मीडियाच्या युगात माहिती वेगाने पसरत असली तरी सत्य महत्त्वाचे असल्याचा अप्रत्यक्ष संदेश देत त्यांनी नागरिकांना जागरूक राहण्याचे आवाहन केले. महिला सक्षमीकरणासाठी सरकारची वचनबद्धता कायम राहील आणि योग्य वेळी पुन्हा प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# उष्णतेची लाट कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यात तापमानाचा पारा झपाट्याने वाढत असून अनेक भागांत तो ४० अंशांपुढे गेला आहे. विदर्भात तर तापमानाने ४४ अंशांचा उच्चांक गाठल्याने उष्णतेची लाट जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने २० ते २२ एप्रिलदरम्यान राज्यातील काही भागांत वादळी पावसाचा इशारा दिला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत दुपारनंतर ढगाळ वातावरण निर्माण होऊन मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. या काळात विजांचा कडकडाट, जोरदार वारे आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

१९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट भाग, उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यात काही प्रमाणात वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाचा प्रभाव वाढण्याची चिन्हे असून पुणे विभाग, छत्रपती संभाजीनगर विभाग तसेच अमरावती विभागातही वादळी पाऊस होण्याची शक्यता आहे. २२ एप्रिलपासून पावसाची तीव्रता कमी होण्याचा अंदाज आहे.

विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा, गडचिरोली आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये तापमान ४४ अंशांवर पोहोचले आहे. यामुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून काही ठिकाणी शाळांच्या वेळांमध्येही बदल करण्यात आला आहे.

दरम्यान, कृषी विभागाने शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, वादळी वारे आणि गारपीट यापासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, असे सांगण्यात आले आहे.

# डेटा सेंटर गुंतवणुकीला गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यात डेटा सेंटर क्षेत्रातील गुंतवणूक वेगाने आकर्षित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. मध्य आशियातील नामांकित कंपन्या महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी उत्सुक असल्याच्या पार्श्वभूमीवर, करारानंतर त्वरित जमीन उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत डेटा सेंटर प्रकल्पांबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीला उद्योगमंत्री उदय सामंत हे व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, डेटा सेंटर प्रकल्पांसाठी आवश्यक सर्व प्रशासकीय प्रक्रिया कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात याव्यात. विशेषतः जमीन उपलब्धतेची प्रक्रिया वेगाने पूर्ण करून गुंतवणूकदारांना विलंब होऊ नये, यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे. डेटा सेंटरसाठी अखंड वीजपुरवठा अत्यावश्यक असल्याने ऊर्जा विभागाला संबंधित प्रकल्पांना प्राधान्याने वीज उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले.

या संदर्भात आवश्यक नियोजन आणि पायाभूत सुविधा उभारणीसाठी तत्काळ उपाययोजना करण्याचेही सांगण्यात आले. शिवाय, सिडको मार्फत डेटा सेंटर प्रकल्पांसाठी स्वतंत्र लॅण्ड बँक विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सब-स्टेशनसाठी आवश्यक जागा तातडीने उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला.

### अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या अधिवेशनाला थाटात सुरुवात

# ब्रेकिंग बातमीचे दिवस गेले : राजेंद्र दर्डा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**उदगीर** : आधुनिक तंत्रज्ञानामुळे वृत्तपत्र क्षेत्रात मोठे बदल झाले असून 'ब्रेकिंग बातम्या' देण्याचे जुने दिवस आता संपले आहेत. या बदलत्या काळात पत्रकारांनी वेगाला नव्हे, तर सत्याला प्राधान्य द्यावे, असे मत ज्येष्ठ संपादक राजेंद्र दर्डा यांनी व्यक्त केले.

लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या ४४ व्या अधिवेशनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर राज्याचे बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आमदार बनसोडे, परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष आष्टीकर, शरद काटकर, लातूरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक उपस्थित होते.

आपल्या भाषणात दर्डा यांनी पत्रकारितेतील बदलांवर भाष्य करताना सांगितले की, आज प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्याने माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. मात्र, प्रत्येक माहितीवर विश्वास ठेवणे धोकादायक ठरू शकते. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या अनेक बातम्या अपूर्ण किंवा चुकीच्या असतात. त्यामुळे पत्रकारांनी तंत्रज्ञानाचा वापर करताना सत्यता पडताळणे अत्यावश्यक आहे. अहमदाबादमधील विमान अपघाताचे उदाहरण देत त्यांनी सांगितले की, ही घटना पारंपरिक माध्यमांनी नव्हे, तर एका तरुणाने काढलेल्या व्हिडिओमुळे पुढे आली. यावरून माहितीचा स्रोत बदलल्याचे स्पष्ट होते. तसेच इराण-इराक संघर्षाच्या काळात व्हायरल झालेल्या अनेक व्हिडिओ कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने तयार करण्यात आले होते, असेही त्यांनी नमूद केले. "वेगाला प्राधान्य देताना सत्य हरवू नये. बातमी देण्यापूर्वी तिची पडताळणी करणे हीच खरी पत्रकारिता आहे," असे दर्डा यांनी ठामपणे सांगितले.

यावेळी एस. एम. देशमुख यांनी पत्रकारांच्या विविध मागण्या उपस्थित केल्या. तसेच उपस्थित मान्यवरांनीही पत्रकारितेतील आव्हाने आणि जबाबदाऱ्या यावर आपले विचार मांडले. महाराष्ट्रासह कर्नाटकातील बिदर, बेळगाव आदी भागांतून पत्रकार मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित होते.

### वारसास्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

# कृष्णामाई मंदिराच्या छताचा भाग कोसळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**सातारा** : महाबळेश्वर येथील प्राचीन श्री कृष्णामाई मंदिराच्या छताचा काही भाग कोसळल्याची घटना समोर आली असून, यामुळे वारसास्थळांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना तीन दिवसांपूर्वी घडली. मंदिरासमोरील गोमुखाखाली असलेल्या कुंडाची स्वच्छता स्थानिक युवकांकडून सुरू होती. ही स्वच्छता साधारणपणे पुरातत्त्व विभागाच्या देखरेखीखाली केली जाते. स्वच्छतेचे काम सुरू असतानाच मंदिराच्या छताचा काही भाग अचानक कोसळून थेट कुंडात पडला. त्या वेळी परिसरात उपस्थित असलेले युवक थोडक्यात बचावले. हे मंदिर पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारीत

मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून नियमित दुरुस्ती न झाल्यामुळे मंदिराची अवस्था जीर्ण झाल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. हजारो वर्षांच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या या मंदिराची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

श्री क्षेत्र महाबळेश्वर हे धार्मिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण असून पंचगंगा मंदिर आणि स्वयंभू शिवलिंग असलेले महाबळेश्वर मंदिर येथे प्रसिद्ध आहेत. त्याच परिसरात अवघ्या शंभर मीटर अंतरावर हेमाडपंथी शैलीतील श्री कृष्णाबाई मंदिर स्थित आहे. हे मंदिरही पुरातत्त्व खात्याच्या ताब्यात आहे. घटनेनंतर पुरातत्त्व विभागाने मंदिराची पाहणी करून लवकरात लवकर डागडुजी करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

### मराठी न शिकवल्यास शाळेची मान्यता रद्द

**पुणे** : राज्यात इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत मराठी भाषा न शिकवणाऱ्या शाळांची मान्यता रद्द करण्यासाठी कार्यपद्धती निश्चित केली असून, तीन महिन्यांत शाळांची पडताळणी करून मान्यता रद्दची कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. कार्यपद्धतीनुसार, मराठी भाषा विषयाचे अध्यापन न करणाऱ्या शाळा व्यवस्थापनांना नोटीस बजावावी, संबंधित व्यवस्थापनाने नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांत विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे खुलासा सादर करणे आवश्यक राहील. शाळा व्यवस्थापनाला एक लाख रुपयांपर्यंत दंड आकारला जाईल.

# केमिकल प्लांटमध्ये भीषण स्फोट

### जेएनपीटी परिसरातील घटनेने खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी मुंबई** : जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) परिसरातील जेडब्ल्यूआर लॉजिस्टिक पार्कमधील एका केमिकल प्लांटमध्ये शनिवारी दुपारी भीषण स्फोट होऊन मोठी आग लागली. सलग तीन स्फोटांमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून दूरवरूनही काळ्या धुराचे लोट दिसत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित केमिकल प्लांटमध्ये अचानक स्फोट झाला आणि काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले. या स्फोटानंतर लागून असलेल्या आणखी दोन युनिटमध्येही स्फोट झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली. जोरदार स्फोटांमुळे कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि परिसरात धावपळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या सुमारे ७ ते ८ गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. परिसरात मोठ्या प्रमाणावर केमिकल कंपन्या असल्याने आग इतर ठिकाणी पसरण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने युद्धपातळीवर उपाययोजना केल्या. आग लागलेल्या ठिकाणाच्या मागील बाजूस डोंगराळ भाग असल्याने तिकडेही आग पसरण्याची भीती व्यक्त केली जात होती.

दरम्यान. चीफ फायर ऑफिसर विजय राणे यांनी आग नियंत्रणात आणण्यात यश आल्याची माहिती दिली. दुपारी सुमारे पाऊण तीनच्या सुमारास आगीची माहिती मिळाल्यानंतर तातडीने कारवाई करण्यात आली. आगीचे स्वरूप मोठे असले तरी वेळीच नियंत्रण मिळवल्यामुळे आसपासचे अनेक भाग सुरक्षित ठेवता आले, असे त्यांनी सांगितले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नसल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

### जनगणना २०२६ साठी मोठा निर्णय

# राज्यात शिक्षकांच्या सुट्या रद्द, बदल्यांना स्थगिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई** : देशव्यापी जनगणना २०२६ मोहिमेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने प्रशासनिक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेतले असून, शिक्षकांच्या उन्हाळी सुट्या रद्द करत गट 'क' आणि 'ड' कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना स्थगिती देण्यात आली आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी ही माहिती दिली.

मे महिन्यापासून राज्यात जनगणना प्रक्रिया सुरू होणार असल्याने शासनाने मनुष्यबळ स्थिर ठेवण्यावर भर दिला आहे. जनगणना अधिनियम १९४८ आणि जनगणना नियम १९९० अंतर्गत येणाऱ्या वैधानिक जबाबदाऱ्या वेळेत आणि अचूकपणे पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदांच्या गट 'क' व 'ड' संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या तात्पुरत्या थांबवण्यात आल्या आहेत. या निर्णयात शिक्षकांचाही समावेश असून, जनगणनेशी संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या ठिकाणीच कार्यरत राहावे लागणार आहे.

या निर्णयामागील मुख्य उद्देश म्हणजे जनगणनेसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध ठेवणे. जनगणना ही केवळ आकडेवारी संकलनाची प्रक्रिया नसून, त्यात माहिती गोळा करणे, नोंदणी, पडताळणी आणि डेटा व्यवस्थापन अशा अनेक टप्प्यांचा समावेश असतो. या सर्व टप्प्यांमध्ये सातत्य आणि समन्वय आवश्यक असल्याने बदल्या टाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, शिक्षकांना या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावावी लागणार आहे. दरवर्षीप्रमाणे मिळणाऱ्या उन्हाळी सुट्ट्यांऐवजी यंदा शिक्षकांना जनगणनेच्या कामासाठी नियुक्त करण्यात आले आहे. २ मे ते १४ जून या कालावधीत शिक्षकांना प्रत्यक्षात सुटी मिळणार नसून त्यांना घरोगरी जाऊन माहिती संकलनाचे काम करावे लागणार आहे. जिल्हा परिषदेच्या सुमारे साडेपाच हजार शिक्षकांना या कामासाठी नियुक्त करण्यात आले असून, खासगी अनुदानित तसेच महापालिका शाळांतील शिक्षकांचाही यात समावेश करण्यात येणार आहे.

प्रशासनाच्या मते, या निर्णयामुळे जनगणना प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल. तसेच विविध विभागांमध्ये समन्वय साधणे सुलभ होईल. जनगणनेतून मिळणारी आकडेवारी ही शासनाच्या धोरणनिर्मितीसाठी, विकास आराखडे तयार करण्यासाठी आणि संसाधनांचे योग्य नियोजन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी विश्वासार्ह आणि अद्ययावत माहिती आवश्यक असल्याने शासनाने हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. जनगणना प्रक्रियेला गती देत ती प्रभावीपणे पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी नमूद केले.

# पुणे येथे हवाई दलाच्या विमानाला तांत्रिक बिघाड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : लोहगाव येथील पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर गुरुवारी मध्यरात्री भारतीय हवाई दलाच्या विमानाला तांत्रिक अडचणीचा सामना करावा लागल्याने धावपट्टी तात्पुरती बंद करण्यात आली. या घटनेमुळे विमानतळावरील उड्डाणांवर परिणाम झाला असून किमान आठ विमाने इतर शहरांकडे वळवण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास हवाई दलाचे लढाऊ विमान लँडिंग करत असताना त्याचे लँडिंग गिअर निकामी झाले. त्यामुळे विमान धावपट्टीवरच अडकून पडले. सुरक्षिततेच्या दृष्टीने धावपट्टी तात्काळ बंद करण्यात आली. हवाई दलाच्या मीडिया समन्वय केंद्राने रात्री ११:४१ वाजता 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वरून माहिती देत, "पुणे विमानतळाची धावपट्टी तांत्रिक कारणांमुळे बंद करण्यात आली आहे. सर्व कर्मचारी सुरक्षित असून धावपट्टी लवकर सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत," असे स्पष्ट केले. या घटनेमुळे पुण्याकडे येणाऱ्या विमानांच्या वेळापत्रकात मोठा बदल झाला. फ्लाइट ट्रॅकिंग माहितीनुसार काही विमाने सुरत, गोवा (मनोहर विमानतळ), नवी मुंबई, चेन्नई आणि कोईम्बतूर येथे वळवण्यात आली. अचानक बदल झाल्याने प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्रशासनाने धावपट्टी मोकळी करून नियमित उड्डाण सेवा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

## संपादकीय

# अविश्वासाची 'ती' भिंत!




**महिला आरक्षणाचे गाजर दाखवून मते पदरात पाडून घेण्याची कला भारतीय राजकारण्यांनी अवगत केली असली, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी निर्माण होणारा 'विश्वासाचा अभाव' हा लोकशाहीसाठी चिंतेचा विषय आहे. संसदेच्या पटलावर कागद नाचवणे आणि प्रत्यक्षात अधिकार सोपवणे यातले अंतर पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे..**

भारतीय राजकारणात काही विषय हे एखाद्या जुन्या, विस्मृतीत गेलेल्या पण अधूनमधून प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी रंगमंचावर आणल्या जाणाऱ्या नाटकासारखे असतात. 'महिला आरक्षण' हा त्यापैकीच एक अत्यंत महत्त्वाचा आणि तितकाच राजकीय सोयीसाठी वापरला जाणारा विषय. संसदेच्या विशेष अधिवेशनात मोठ्या गाजावाजात 'नारी शक्ती वंदन' कायद्याची तुतारी वाजवण्यात आली, तेव्हा खरोखरच भारतीय लोकशाहीचे एक नवे, अधिक समावेशक पान उघडले जाईल, अशी आशा भोळ्याभाबड्या मतदारांना वाटली असावी. संसदेच्या दोन्ही बाजूंमध्ये असलेला 'विश्वासाचा अभाव' पाहता, हे विधेयक म्हणजे केवळ निवडणुकीच्या बाजारात मांडलेले एक देखणे खेळणे होते की काय, अशी शंका घेण्यास वाव आहे. सत्तेच्या सारीपाटावर स्त्रियांच्या हक्कांचा बळी देण्याची प्रथा ही काही नवी नाही, पण प्रगत तंत्रज्ञानाच्या युगातही जेव्हा हे विधेयक 'अविश्वासा'च्या गर्तेत अडकते, तेव्हा आपल्या राजकीय प्रगल्भतेची कीव करावी वाटते. मुळात, कोणत्याही धोरणात्मक निर्णयासाठी लागणारी 'राजकीय इच्छाशक्ती' आणि 'परस्पर विश्वास' या दोन गोष्टींचा आपल्या संसदेत सध्या तीव्र दुष्काळ आहे. महिला आरक्षण विधेयकाच्या अंमलबजावणीत निर्माण झालेली कोंडी ही केवळ तांत्रिक नाही, तर ती पूर्णतः राजकीय आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये असलेला अविश्वास इतका पराकोटीला पोहोचला आहे की, एका चांगल्या निर्णयाचे श्रेय दुसऱ्याला मिळू नये, यासाठी दोन्ही बाजूंनी चढाओढ सुरू आहे. यात भर पडली आहे ती 'जनगणना' आणि 'मतदारसंघांच्या पुनर्रचनेची' (डिलीमिटेशन). या अविश्वासाच्या मुळाशी 'उत्तर विरुद्ध दक्षिण' असा एक नवा संघर्षही दडलेला आहे. मतदारसंघांची पुनर्रचना झाली तर उत्तर भारतीय राज्यांच्या जागा वाढतील आणि दक्षिणेकडील राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होईल, अशी रास्त भीती दक्षिण भारताला वाटते. या भौगोलिक-राजकीय पेचप्रसंगात महिला आरक्षणाला ओलीस धरले गेले आहे. जर आरक्षण अमलात आणायचेच असेल, तर त्यासाठी मतदारसंघांची पुनर्रचना ही अट कशासाठी? सध्याच्या जागांमध्येच ३३ टक्के आरक्षण का दिले जाऊ शकत नाही? या अविश्वासाच्या राजकारणात सर्वात मोठे नुकसान हे देशाच्या अर्ध्या लोकसंख्येचे होत आहे. जगभरातील प्रगत लोकशाही देशांकडे नजर टाकली, तर तिथे महिलांचा सहभाग केवळ नावापुरता नसून धोरणनिर्मितीत त्यांचा सक्रिय वाटा असल्याचे दिसते. स्कॅन्डेनेव्हियन देशांचे उदाहरण घ्या किंवा अगदी आपल्या शेजारच्या बांगलादेशाचे; तिथे महिलांच्या राजकीय सहभागामुळे समाजात झालेले बदल लक्षणीय आहेत. अविश्वास हा केवळ धोरणांवर नाही, तर तो एकमेकांच्या हेतूंवर आहे. महिला आरक्षणासारखा संवेदनशील आणि दूरगामी परिणाम करणारा विषय केवळ 'घोषणाबाजी'ने सुटणारा नाही. त्यासाठी विरोधकांना विश्वासात घेणे, त्यांच्या शंकांचे निरसन करणे आणि एक 'नॅशनल कन्सन्सस' (राष्ट्रीय सहमती) तयार करणे आवश्यक होते. मात्र, सत्तेच्या अहंकाराने पछाडलेल्या व्यवस्थेला सहमतीपेक्षा 'शक्तीप्रदर्शन' अधिक प्रिय वाटते. विरोधकही विरोधासाठी विरोध या भूमिकेतून बाहेर पडायला तयार नाहीत. 'क्रेडीट वॉर'च्या या रणधुमाळीत महिलांच्या हक्कांचा बळी दिला जात आहे. महिला आरक्षण हे भारतीय लोकशाहीच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी आवश्यक आहे. स्त्रियांचा राजकारणातील वाढता सहभाग हा अधिक संवेदनशील, भ्रष्टाचारमुक्त आणि विकासभिमुख राजकारणाकडे नेणारा मार्ग असू शकतो. पण दुर्दैवाने, हा मार्ग सध्या अविश्वासाच्या काटेरी कुंपणाने अडवला गेला आहे. मतदारसंघांची पुनर्रचना कधी होईल, जनगणना कधी पार पडेल आणि त्यानंतर महिलांना त्यांचे हक्क कधी मिळतील, याची कोणतीही ठोस कालमर्यादा सरकार देत नाही. ही अनिश्चितता म्हणजेच महिलांची थट्टा आहे. आता २०२६ मध्येही आपण त्याच जागी उभे आहोत, जिथे चर्चा भरपूर आहे पण कृती शून्य. प्रश्न केवळ आरक्षणाचा नाही, तर तो आपल्या राजकीय संस्कृतीचा आहे. अविश्वासाची ही भिंत पाडल्याशिवाय स्त्रीशक्तीचा खरा उदय होणे कठीण आहे. अन्यथा, हे विधेयक लोकशाहीच्या इतिहासाच्या पुस्तकातील एक 'अधुरे स्वप्न' म्हणूनच दुर्दैवाने कायमस्वरुपी लिहिले जाईल, यात कोणताही संदेह नाही.

# प्रज्ञेचा 'कॅम्पस' आणि अविश्वासाचा कडा!



**» जागतिक प्रज्ञेची मानचिन्हे समजली जाणारी अमेरिकन विद्यापीठे सध्या वैचारिक ध्रुवीकरणाच्या आगीत होरपळत आहेत. संस्थात्मक विश्वास गमावल्यानंतर केवळ टोकाची भूमिका कशी उरते, याचा वस्तुपाठ या निमित्ताने समोर आला असून, संवादाची दारे बंद होणे ही प्रगत लोकशाहीच्या अंताची पहिली न कळालेली नांदी ठरत आहे.**

जगभरातील बुद्धिमंतांची पंढरी मानली जाणारी आणि जिथे 'लिबर्टी' शब्दाचा अर्थ केवळ राजकीय नसून बौद्धिकही असतो, अशा अमेरिकन विद्यापीठांच्या आवारात सध्या जे घडते आहे, ते केवळ एका देशातील शैक्षणिक गोंधळाचे लक्षण नाही. ती एका जागतिक संस्थात्मक ऱ्हासाची अत्यंत भयावह अशी 'केस स्टडी' आहे. हार्वर्ड, येल किंवा पेनसिल्व्हेनिया यांसारख्या संस्था म्हणजे केवळ विटा-मातीची बांधकामे नसून, ती मानवी प्रज्ञेची आणि मुक्त संवादाची अभेद्य दुर्ग मानली जात होती. मात्र, अलिकडच्या काळात या दुर्गांना आतूनच अविश्वासाची वाळवी लागली आहे. 'इंडियन एक्स्प्रेस'ने अमेरिकन विद्यापीठांमधील या संकटावर जे भाष्य केले आहे, त्यातील कळीचा मुद्दा आहे- 'ट्रस्ट' अर्थात विश्वास. एकदा का संस्थांवरील विश्वास उडाला की, तिथे संवादाची जागा घोषणाबाजी घेते आणि तर्कशास्त्राची जागा उन्माद घेतो.

मुळात विद्यापीठे ही केवळ पदव्या वाटण्याची कारखाने नसतात, तर ती परस्परविरोधी विचारांच्या घुसळणातून सत्य शोधण्याची केंद्रे असतात. पण आज अमेरिकेतील चित्र याच्या अगदी उलट आहे. तिथल्या कॅम्पसमध्ये सध्या 'कॅन्सल कल्चर' आणि वैचारिक कट्टरतेने इतकी मुळे धरली आहेत की, साध्या चर्चेसाठीही तिथे जागा उरलेली नाही. इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष असो किंवा वांशिक वादाचे नवे फुटलेले धुमारे; विद्यापीठांनी तिथे 'बौद्धिक मध्यस्थ' म्हणून भूमिका बजावणे अपेक्षित होते. त्याऐवजी, तिथल्या नेतृत्वाने म्हणजेच विद्यापीठांच्या अध्यक्षांनी राजकीय दबावाखाली किंवा 'डोनेट' करणाऱ्या धनदांडग्यांच्या भीतीपोटी जी अगतिकता दाखवली, ती त्यांच्या नैतिक अध:पाताची साक्ष आहे. अमेरिकन विद्यापीठांमधील या गोंधळातून भारतीय शैक्षणिक आणि राजकीय व्यवस्थेने घेण्यासारखा सर्वात मोठा धडा म्हणजे—संस्थात्मक विश्वास निर्माण करणे कठीण असते, पण तो गमावणे अत्यंत सोपे. एखाद्या विषयावर मतभिन्नता असणे हे जिवंत लोकशाहीचे लक्षण आहे, पण त्या मतभिन्नतेचे रूपांतर जेव्हा 'शत्रुत्वात' होते, तेव्हा संवाद संपतो. अमेरिकेतील कॅम्पसमध्ये सध्या हेच घडत आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यात दोन स्पष्ट गट पडले आहेत, जे एकमेकांचे म्हणणे ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नाहीत. यातून जे 'पोलरायझेशन' (ध्रुवीकरण) निर्माण झाले आहे, त्याने विद्यापीठांच्या प्रतिमेला तडे दिले आहेत. हीच ती वेळ आहे जेव्हा विचारवंतांनी स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे की, आपण 'सत्य' शोधत आहोत की केवळ आपल्या पूर्वग्रहांची पुष्टी करत आहोत? याचा भारताशी काय संबंध? असा प्रश्न विचारणाऱ्यांनी आपल्याकडच्या जेएनयू, जामिआ किंवा अगदी आयआयटीमधील वाढत्या वादांकडे डोळे उघडून पाहावे. अमेरिकेत जे घडते, ते काही वर्षांनी आपल्याकडे 'ट्रेंड' म्हणून येते. संवादाचा अभाव आणि संस्थांवरील अविश्वास ही लागण आपल्याकडेही वेगाने पसरत आहे. जेव्हा कुलगुरूंची नेमणूक गुणवत्तेपेक्षा 'विचारधारे'च्या आधारावर होते किंवा जेव्हा विद्यार्थ्यांच्या आंदोलनांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहिले जाते, तेव्हा आपणही त्याच अविश्वासाच्या दरीत पाऊल टाकत असतो. अमेरिकेतील विद्यापीठांचे अध्यक्ष जेव्हा संसदेसमोर हजर झाले आणि त्यांना आपल्या भूमिकेचे स्पष्ट समर्थन करता आले नाही, तेव्हा ती केवळ त्यांची वैयक्तिक हार नव्हती, तर ती एका पूर्ण शिक्षण व्यवस्थेची शरणागती होती.

शहाण्या माणसांनी हे लक्षात घ्यायला हवे की, विश्वास हा एका दिवसात तयार होत नाही. तो वर्षांच्या पारदर्शकतेतून आणि न्याय्य वागणुकीतून निर्माण होतो. अमेरिकन विद्यापीठांनी स्वतःला एका 'एको चेंबर'मध्ये कोंडून घेतले आहे, जिथे त्यांना फक्त स्वतःच्याच विचारांचा प्रतिध्वनी ऐकू येतो. बाहेरच्या जगातील वास्तविकता आणि कॅम्पसमधील 'आइडिऑलॉजी' यातली दरी इतकी वाढली आहे की, सामान्य माणूस या संस्थांकडे संशयाने पाहू लागला आहे. जेव्हा सामान्य करदात्याला किंवा पालकाला असे वाटते की, हे विद्यापीठ माझ्या मुलाला 'शिक्षण' नाही तर 'प्रोपॅगंडा' शिकवत आहे, तेव्हा त्या संस्थेचा पाया डळमळीत होतो. ही केवळ अमेरिकेची समस्या नाही, तर ती आधुनिक सुधारणावादाची शोकांतिका आहे. अमेरिकन विद्यापीठांचे हे संकट म्हणजे 'बौद्धिक दिवाळखोरी' जाहीर होण्यापूर्वीची शेवटची चेतावणी आहे. ज्या देशात 'स्टॅचू ऑफ लिबर्टी' आहे, तिथे विचारांची लिबर्टी धोक्यात येणे हे दुर्दैवी आहे. पण यातून जो धडा मिळतोय तो जागतिक आहे, हे लक्षात घेतले म्हणजे झाले.

# ३० जूनपर्यंत मालमत्ताकर भरल्यास सवलती

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेने मालमत्ताकर वेळेत भरणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती जाहीर केल्या आहेत. ३० जूनपर्यंत कर भरल्यास सामान्यकरावर सूट मिळणार असून, एकूण १६ प्रकारच्या सवलतींचा लाभ मालमत्ताधारकांना घेता येणार आहे.

महापालिकेकडून चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी सामान्यकरावर ५ टक्के सवलत जाहीर करण्यात आली आहे. तसेच, ऑनलाइन पद्धतीने कर भरणाऱ्या नागरिकांना अतिरिक्त ५ टक्के सूट दिली जाणार आहे. कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, नागरिकांना घरबसल्या कर भरता येत आहे.

महापौर रवी लांडगे यांनी नागरिकांना ३० जूनपूर्वी कर भरण्याचे आवाहन करत, आगाऊ कर भरणाऱ्यांसाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही आकर्षक सवलती देण्यात आल्याचे सांगितले.

महापालिकेने जाहीर केलेल्या प्रमुख सवलती पुढीलप्रमाणे आहेत : ३० जूनअखेर कर भरल्यास सामान्यकरात ५ टक्के सूट, ऑनलाइन कर भरण्यावर अतिरिक्त ५ टक्के सूट, महिलांच्या नावे असलेल्या एका निवासी मालमत्तेसाठी ३० टक्के सूट, दिव्यांग व्यक्तीच्या मालमत्तेसाठी ५० टक्के सूट, स्वातंत्र्यसैनिक किंवा त्यांच्या पत्नीच्या नावावरील मालमत्तेसाठी ५० टक्के सूट

पर्यावरणपूरक उपक्रम राबवणाऱ्या मालमत्तांसाठीही विशेष सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. हाऊसिंग सोसायटीमध्ये कंपोस्टिंग यंत्रणा असल्यास ५ टक्के, एसटीपी प्लांट असल्यास ३ टक्के, तर दोन्ही सुविधा असल्यास ८ टक्के सूट दिली जाईल. झिरो वेस्ट संकल्पना राबवणाऱ्यांना ८ टक्के, तसेच झिरो वेस्ट आणि एसटीपी एकत्रित असल्यास १० टक्के सवलत मिळणार आहे. शैक्षणिक संस्थांसाठीही विविध निकषांनुसार सवलती निश्चित करण्यात आल्या असून, कंपोस्टिंग, झिरो वेस्ट, रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि सौर ऊर्जा प्रकल्प राबवणाऱ्यांना ४ ते १० टक्क्यांपर्यंत सूट दिली जाणार आहे. करसंकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी नागरिकांना वेळेत कर भरण्याचे आवाहन करत, या सवलतींचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे सांगितले. वेळेत कर भरल्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊन शहरातील मूलभूत सुविधा अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होते, असेही त्यांनी नमूद केले.

# शहरात उष्णतेचा कहर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरात उष्णतेची तीव्र लाट कायम असून तापमानाने चाळीशीचा टप्पा गाठला आहे. गेल्या काही दिवसांपासून वाढत असलेला उकाडा शुक्रवारी (दि. १७) उच्चांकावर पोहोचला आणि शहरात ४० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून दिलासा मिळत नसल्याचे चित्र आहे.

गेल्या आठ दिवसांपासून तापमान सतत ३७ अंशांपेक्षा अधिक नोंदवले जात आहे. कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असून, बाहेर पडणाऱ्या नागरिकांना डोकेदुखी, चक्कर, मळमळ आणि उलटी यांसारखे त्रास जाणवत आहेत. दुपारच्या वेळेत शहरातील प्रमुख रस्त्यांवरही वर्दळ कमी झाल्याचे दिसत आहे. उन्हापासून बचावासाठी टोपी, छत्री किंवा गॉगल वापरले तरीही उष्णतेची तीव्रता कमी होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तज्ज्ञांनी नागरिकांना उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन केले आहे. दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडणे टाळावे, आवश्यक असल्यास डोक्यावर पांढरे कापड किंवा टोपी वापरावी, सैल व पांढरे कपडे परिधान करावेत, असे त्यांनी सांगितले. तसेच, शरीरातील पाण्याची पातळी कायम राखण्यासाठी भरपूर पाणी पिणे, काकडी, टरबूज, कलिंगड यांसारखी रसाळ फळे खाणे, तसेच लिंबूपाणी, ताक, दही, लस्सी, उसाचा रस यांसारख्या पेयांचे सेवन करण्याचा सल्ला दिला आहे.

# रोहित्राला भीषण आग; अतिक्रमणाचा मुद्दा ऐरणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळे गुरव** : नवी सांगवीतील कृष्णा चौक ते एम. एस. काटे चौक मार्गावर मंगळवारी रात्री महावितरणच्या रोहित्राला अचानक आग लागून मोठी घटना घडली. ज्ञानेश पार्कजवळील रोहित्र या आगीत पूर्णपणे जळून खाक झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र परिसरातील अनधिकृत टपऱ्या आणि अतिक्रमणाचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे.

रोहित्राच्या अगदी जवळ उभ्या असलेल्या तीन अनधिकृत टपऱ्यांमुळे आग अधिक वेगाने पसरल्याचे दिसून आले. अतिक्रमणामुळे रोहित्राभोवती सुरक्षित अंतरच राहिले नव्हते. यापैकी एका टपरीतील गॅस सिलिंडर वेळीच बाहेर काढण्यात आल्याने संभाव्य मोठा स्फोट टळला आणि मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ वीजपुरवठा खंडित करून पुढील धोका रोखला. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी रोहित्र आणि डीपी बॉक्सच्या शेजारी उभारलेल्या बेकायदेशीर शेड्समुळेच ही घटना भीषण स्वरूपात गेल्याचे स्पष्ट होत आहे. विद्युत उपकरणांच्या आजूबाजूला वाढलेले अतिक्रमण आता गंभीर धोक्याचे कारण बनले आहे.

# ९९ सोसायट्यांचे एसटीपी बंद; पालिकेचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड शहरातील शंभरहून अधिक सदनिका असलेल्या मोठ्या हाऊसिंग सोसायट्यांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) सुरू ठेवणे बंधनकारक असतानाही तब्बल ९९ सोसायट्यांमधील एसटीपी बंद असल्याचे महापालिकेच्या पाहणीत उघड झाले आहे.

वारंवार नोटिसा देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने आता महापालिकेने अशा सोसायट्यांवर दंडात्मक कारवाईसह नळजोड तोडण्याचा आणि पुढे फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

शहराचा वेगाने विस्तार आणि वाढती लोकसंख्या यामुळे पाण्याची मागणीही वाढत आहे. सध्या शहराला दररोज सुमारे ६५० एमएलडी पाणीपुरवठा केला जात असला तरी अनेक सोसायट्यांना खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. उन्हाळ्यामुळे बोरवेल आणि विहिरी कोरड्या पडल्याने पाणीटंचाई तीव्र झाली आहे. अपुरा, दूषित आणि कमी दाबाने होणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबतच्या तक्रारीही वाढल्या आहेत.

महापालिकेच्या सर्वेक्षणात अनेक सोसायट्यांमध्ये एसटीपी बंद असल्याचे, काही ठिकाणी केवळ नावापुरते सुरू असल्याचे, तर काही ठिकाणी सांडपाणी थेट ड्रेनेज लाईन किंवा नाल्यात सोडले जात असल्याचे आढळले. काही सोसायट्यांनी तपासणी पथकाला प्रवेश नाकारल्याचीही बाब समोर आली; पोलिस बंदोबस्तानंतरच तपासणी शक्य झाली.

या पार्श्वभूमीवर महापालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. प्रथम दंड आकारला जाईल, त्यानंतर पिण्याच्या पाण्याचा नळजोड तोडला जाईल आणि तरीही नियमांचे पालन न झाल्यास संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

महापालिकेच्या मते, एसटीपी सुरू ठेवल्यास वापरलेले पाणी प्रक्रिया करून पुन्हा वापरता येते. हे पाणी स्वच्छतागृह, उद्याने, हिरवळ, पार्किंग आणि स्वच्छतेसाठी उपयोगात आणल्यास पिण्याच्या पाण्याची मोठी बचत होते आणि शहरातील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होते.

युनिफाइड डेव्हलपमेंट कंट्रोल अँड प्रमोशन रेग्युलेशन्स (यूडीसीपीआर)नुसार २० हजार चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळ, १०० पेक्षा अधिक सदनिका आणि दररोज २० हजार लिटरपेक्षा जास्त पाणी वापरणाऱ्या सोसायट्यांसाठी एसटीपी उभारणे आणि नियमित सुरू ठेवणे बंधनकारक आहे.

शहरातील ४९४ मोठ्या सोसायट्यांपैकी ३९५ मध्ये एसटीपी कार्यरत आहेत, तर ९९ सोसायट्यांमध्ये ते बंद असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून या सोसायट्यांना मार्गदर्शन केले जात असून आवश्यक तांत्रिक मदतही दिली जात आहे, असे कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांनी सांगितले. तरीही नियमांचे उल्लंघन सुरू राहिल्यास कठोर कारवाई अपरिहार्य असेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# वाहतूक कर्मचाऱ्याला धमकावून खंडणीचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे** : वाकड परिसरात वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्याला धमकावून खंडणी उकळण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीला अटक केली असून इतर दोघांचा शोध सुरू आहे. ही घटना १४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास भुजबळ चौक परिसरात घडली. तक्रारदार हे वाहतूक नियंत्रण शाखेत कार्यरत असून कर्तव्य बजावत असताना आरोपींनी त्यांच्याशी संपर्क साधला.

तक्रारदाराने केलेल्या वाहन कारवाईचा व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपींनी "व्हिडिओ व्हायरल करायचा नसेल तर ५० हजार रुपये द्या, तसेच दंडाची रक्कम भरा," अशी मागणी केली. यापूर्वीच आरोपींनी तक्रारदाराकडून १००० रुपये घेतल्याचेही तपासात समोर आले आहे. या प्रकरणी वाकड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०८(२), ३(५), तसेच ३८४ आणि ३४ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांनी मुख्य आरोपी वरद मनोज चव्हाण याला अटक केली असून उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरू आहे. पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**भोसरीत केमिकल दुकानात ४१ लाखांचा अपहार**

**भोसरी :** येथील एका केमिकल दुकानातील कर्मचाऱ्यांनीच विश्वासघात करत तब्बल ४१ लाख ८२ हजार ६१४ रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी भोसरी पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी अमित श्रीराम दरक (वय ४१, रा. इंद्रायणीनगर, भोसरी) यांनी त्यांच्या केमिकल दुकानात संबंधित आरोपींना कामावर ठेवले होते. मात्र, आरोपींनी विश्वासाचा गैरफायदा घेत दुकानातील लिक्विड व पावडर केमिकल माल चोरीने विक्री केल्याचे तपासात समोर आले आहे. ही घटना १ ऑगस्ट २०२३ ते २४ मार्च २०२५ या कालावधीत गुलवे वस्ती, भोसरी येथील दुकानात घडली. आरोपींनी संगनमत करून मालाची अनधिकृत विक्री करत सुमारे ४१.८२ लाख रुपयांचा अपहार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी राजेंद्र हनुमान कासट, संदीप ज्ञानदेव सदांशीव आणि बाबुराव बोराडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(४), ३१८(४) आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी एका आरोपीला अद्याप अटक झालेली नाही. भोसरी पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत असून, या घटनेमुळे स्थानिक व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**गुंतवणुकीच्या आमिषाने ८४ लाखांची फसवणूक**

**तळेगाव :** तळेगाव एमआयडीसी परिसरात मोठ्या गुंतवणूक फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला असून, सुमारे ८४ लाख ७४ हजार रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार नोंदवण्यात आली आहे. या प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपी फरार आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी चेतन श्रीकांत चव्हाण (वय ४३, रा. मुंबई) यांची आरोपी शैलेश पटेल (रा. गुजरात) आणि सुजित ठाकूर (रा. विरार) यांनी ओळख करून घेत मोठ्या परताव्याचे आमिष दाखवले.

कंपनीत कोट्यवधींची गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे सांगून त्यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन केला. यानंतर आरोपींनी वेगवेगळ्या तारखांना फिर्यादीकडून सुरुवातीला १५,१४,००० रुपये आणि त्यानंतर ६९,६०,००० रुपये अशा टप्प्याटप्प्याने एकूण सुमारे ८४,७४,००० रुपये विविध बँक खात्यांमध्ये जमा करून घेतले. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही गुंतवणूक न करता पैसे परत न करता आरोपींनी फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

ही घटना १४ फेब्रुवारी २०२४ ते २३ जुलै २०२४ या कालावधीत घडली असून, १६ एप्रिल २०२६ रोजी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला असून पुढील तपास सुरू आहे.

# ऑनलाइन ट्रेडिंगच्या आमिषाने फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तळेगाव** : तळेगाव दाभाडे परिसरात ऑनलाइन ट्रेडिंगच्या नावाखाली २५ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादीने सोशल मीडियावरील जाहिरातीद्वारे ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीची माहिती घेतली. एका नामवंत बँकेच्या नावाने गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करण्यात आले. त्यानंतर अज्ञात आरोपीने स्वतःला एचडीएफसी सिक्युरिटीजचा प्रतिनिधी असल्याचे भासवून फिर्यादीला व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सामील केले. यानंतर विश्वास संपादन करून आरोपीने फिर्यादीकडून टप्प्याटप्प्याने २५.३० लाख रुपये ऑनलाइन स्वरूपात घेतले. मात्र, गुंतवणुकीवर कोणताही परतावा न देता तसेच रक्कम परत न करता आरोपी फरार झाला. ही घटना २६ जानेवारी २०२६ ते ६ मार्च २०२६ या कालावधीत घडली असून, १६ एप्रिल रोजी रात्री १०:३२ वाजता गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(२), ३१८(४), ३१९(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६(सी) आणि ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कांबळे करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### चिखलीत तरुणावर कोयत्याने हल्ला

**पुणे** : चिखली परिसरात चार अल्पवयीन मुलांनी एका २० वर्षीय तरुणावर कोयत्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून जखमी तरुणावर उपचार सुरू आहेत. ही घटना १५ एप्रिल रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास टॉवर लाईन परिसरात, शिवम मेडिकलसमोर घडली. पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी आर्यन राजाराम चव्हाण (वय २०, रा. श्रीराम कॉलनी, मोरे वस्ती, चिखली) हा आपल्या मित्रासोबत दुचाकीवरून जात असताना काही अल्पवयीन मुले रस्त्यात उभी होती. रस्ता मोकळा करण्यासाठी हॉर्न वाजवल्यानंतर आरोपींनी संताप व्यक्त केला. “आम्हाला ओळखत नाहीस का?” असे म्हणत आरोपींनी तरुणाला अडवले. त्यानंतर दोघांनी त्याला पकडून ठेवले, तर उर्वरित दोघांनी कोयत्याने त्याच्या डोक्यावर आणि दोन्ही हातांवर वार केले. या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला.

### सांगवीत गांजासह एकाला अटक

**पिंपरी** : सांगवी परिसरात पोलिसांनी केलेल्या कारवाईत गांजाची तस्करी करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून सुमारे १४ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत एकूण ७ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई १५ एप्रिल २०२६ रोजी रात्री उशिरा पावर हाऊस परिसरात करण्यात आली. संशयास्पद हालचाली करत असलेल्या व्यक्तीची तपासणी केली असता त्याच्याकडून मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव गणेश कैलास चव्हाण (वय ३०, रा. शिरूर, पुणे) असे आहे. त्याच्याकडील गांजा हा विनोद झरे नावाच्या व्यक्तीकडून विक्रीसाठी आणल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात गांजासह दुचाकी आणि दोन मोबाईल फोनचा समावेश आहे.

### धडक नोटिसांनी अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले

# खेड तहसीलदारांचा भूमाफियांवर ‘सर्जिकल स्ट्राईक’

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर** : खेड तालुक्यातील सरकारी आणि गायरान जमिनींवर बेकायदेशीर अतिक्रमण करून वैयक्तिक बेसुमार फायदा लाटणाऱ्या भूमाफियांवर महसूल प्रशासनाने हातोडा उगारला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र. १२७/२०२२ च्या कडक आदेशानंतर, प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार प्रशांत बेडसे आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात व्यावसायिक अतिक्रमणधारकांना तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या सहीने निष्कासनाच्या (कारणे दाखवा) नोटिसा नुकत्याच बजावण्यात आल्या आहेत. येत्या २४ एप्रिलला सुनावणी ठेवण्यात आली असून, पुरावे सादर न केल्यास या मिळकतींवर थेट बुलडोझर फिरवला जाणार आहे. या आक्रमक कारवाईमुळे तालुक्यातील भूमाफियांमध्ये दहशत पसरली आहे.

खेड महसूल आणि ग्रामविकास विभागाने गोलेगाव, पिंपळगाव तर्फे चाकण आणि परिसरातील गायरान जमिनींची बारकाईने पाहणी केली. यात निवासी तसेच व्यावसायिक अतिक्रमणे उघडकीस आली. प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने हे सर्वेक्षण पूर्ण करून कायदेशीर रणनीतीनुसार कारवाईचा आराखडा तयार केला आहे.

प्रशासनाने पहिल्या टप्प्यात फक्त व्यावसायिक गाळे, दुकाने आणि शेड्स यांना लक्ष्य केले आहे. कारण सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय आणि शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार सार्वजनिक जमिनीवरील व्यावसायिक अतिक्रमणे कधीही नियमित करता येत नाहीत. निवासी अतिक्रमणांमध्ये काही अपवादात्मक तरतुदी असू शकतात; मात्र व्यावसायिक बांधकामांना कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही. त्यामुळे प्रशासनाने धोरणात्मक निर्णय घेत प्रथम व्यावसायिक अतिक्रमणे हटवण्यास प्राधान्य दिले आहे.

या कारवाईत सुनावणीदरम्यान अतिक्रमणधारक कायदेशीर परवानगीचे पुरावे सादर करू शकले नाहीत, तर थेट बुलडोझर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच, गेल्या ४ वर्षांतील (किंवा अधिक) दंडात्मक भाडे वसूल करण्यात येणार आहे. दंड न भरल्यास सातबारा उताऱ्यावर शासनाचा बोजा नोंदवला जाईल. याशिवाय संबंधितांवर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी सांगितले.

ही कारवाई केवळ गाळे पाडण्यापुरती मर्यादित राहणार नसून भूमाफियांना कायमचा धडा शिकवण्यासाठी प्रशासनाने सर्व कायदेशीर उपाययोजना हाती घेतल्या आहेत. प्रांताधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी तयार केलेल्या ॲक्शन प्लॅनमुळे खेड तालुक्यात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना प्रशासनाने दाखवलेली आक्रमकता आणि पारदर्शकता यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे, तर अतिक्रमणधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. २४ एप्रिलच्या सुनावणीनंतर अतिक्रमणविरोधी पथक आणि पोलिसांचा फौजफाटा कारवाईसाठी कोणत्याही क्षणी सज्ज राहू शकतो. ही ‘सर्जिकल स्ट्राईक’ खेड तालुक्यातील अतिक्रमणां विरोधातील प्रशासनाच्या ठाम भूमिकेचे प्रतीक ठरत आहे.

## प्राथमिक शाळेतूनही मोठे यश शक्य : मंगेश धोत्रे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर** : प्राथमिक शाळेत शिक्षण घेतले म्हणून न्यूनगंड बाळगण्याचे काहीही कारण नाही; सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास अत्युच्च यश गाठता येते, असे प्रतिपादन प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीपदी निवड झालेल्या मंगेश आनंदराव धोत्रे यांनी येथे केले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून मंगेश धोत्रे यांची प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारीपदी निवड झाली. त्याबद्दल त्यांचा सत्कार त्यांनी शिक्षण घेतलेल्या राजगुरुनगर प्राथमिक शाळा क्रमांक १ यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक राजेश कांबळे होते. यावेळी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर कडलक, रेटवडी शाळेचे मुख्याध्यापक जालिंदर दिघे, माजी शिक्षिका अश्विनी घुमटकर, सुजाता दिघे, माजी विद्यार्थी प्रा. आशिष कदम, सुरज खंडागळे, गणेश राक्षे, गणेश रावळ, पदवीधर शिक्षक द. मा. पिंगळे, विठ्ठल खेडकर, जयसिंग उकिर्डे, स्मिता पवळे, गीता सांगडे आदी उपस्थित होते.

धोत्रे म्हणाले की, आई-वडील आणि शिक्षक हेच आपले खरे हितचिंतक असतात. प्राथमिक शिक्षण हे संस्कारक्षम असून आयुष्याला दिशा देणारे असते. सातत्याने प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रा. सुरज खंडागळे आणि मुख्याध्यापक राजेश कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सर्वसामान्य कुटुंबातून येऊन कुठल्याही विशेष मार्गदर्शनाशिवाय मिळवलेले धोत्रे यांचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे कांबळे यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पारितोषिक विजेते पदवीधर शिक्षक द. मा. पिंगळे यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक ज्ञानेश्वर कडलक यांनी मानले.

## आळंदीत शिवमहापुराण कथा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**आळंदी** : येथील इंद्रायणी नदी घाटावर आयोजित महिला अखंड हरिनाम सप्ताहात शिवमहापुराण कथा भक्तीमय आणि ज्ञानमय वातावरणात, हरिनामाच्या गजरात रंगत आहे. या सप्ताह सोहळ्यात श्रीजीधामचे प्रमुख ह.भ.प. संतोषानंद शास्त्री आपल्या सुश्राव्य आणि हृदयस्पर्शी वाणीतून कथा सांगत आहेत.

या कथा श्रवणासाठी आळंदी पंचक्रोशीसह पुणे परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असून शिवपुराण कथा श्रवणाची पर्वणी अनुभवत आहेत. सप्ताहात श्रीग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास महिलांची लक्षणीय उपस्थिती दिसून येत आहे. १३ ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत अलंकापुरीत या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजक संतसेविका कमलताई काटकर घुंडरे पाटील यांनी दिली.

२० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. रजनीताई महाराज जाधव (नाशिक) यांच्या काल्याचे कीर्तनसेवा आणि महाप्रसाद वाटपाने सप्ताहाची सांगता हरिनाम गजरात होणार आहे. इंद्रायणी घाट प्रांगण, शनि मंदिरासमोर या ठिकाणी हा सप्ताह सुरू आहे. तीर्थक्षेत्र आळंदी हे संत ज्ञानेश्वर महाराजांचे संजीवन समाधीस्थान असल्याने पुण्यासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने येथे येत आहेत. सप्ताहात सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी गाथा भजन, संध्याकाळी हरिपाठ, तर रात्री शिवमहापुराण कथा, आरती आणि इंद्रायणी आरती हरिनाम गजरात होत आहे. या अखंड हरिनाम सप्ताहात सहभागी होऊन शिवमहापुराण कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कमलताई काटकर घुंडरे पाटील यांनी केले आहे. विविध मान्यवरांच्या हस्ते आरती पार पडत असून अन्नदान महाप्रसाद वाटपासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. उत्साहात महाप्रसाद सेवा सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

## पै. स्वराज काळभोर यांनी जिंकली मानाची कुस्ती

### शिंगवे येथील जंगी आखाड्यात लक्ष वेधले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील शिंगवे येथे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज आणि माता जोगेश्वरी यात्रेनिमित्त भरविण्यात आलेल्या जंगी आखाड्यात पैलवान स्वराज काळभोर यांनी मानाची कुस्ती जिंकत लक्ष वेधले. अंतिम ४१ हजार रुपयांच्या कुस्तीत त्यांनी सनी जाधव यांच्यावर मात करत विजेतेपद पटकावले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शिंगवे येथे यात्रेनिमित्त मोठ्या उत्साहात आखाड्याचे आयोजन करण्यात आले होते. पुणे, खेड, आळंदी, नगर, श्रीगोंदा, शिरापूर, मुंबई, पारनेर आदी भागांतील नामांकित पैलवानांनी या आखाड्यात सहभाग घेतला. पन्नास रुपयांपासून ते ४१ हजार रुपयांपर्यंत विविध गटांतील कुस्त्या रंगल्या आणि प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात त्या पार पडल्या. यंदाच्या आखाड्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महिला पैलवानांचा सहभाग. अक्षदा मोरे, लावण्या गोडसे, सबुरी ढोकळे आणि रिद्धी थोपटे यांच्या कुस्त्यांनी विशेष लक्ष वेधले. त्यांच्या दमदार खेळाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. स्पर्धेसाठी पंच म्हणून राष्ट्रीय कुस्ती पंच धोंडीभाऊ पाबळे, राजेंद्र पाबळे, रामकृष्ण राजगुरू, सुशील राजगुरू आणि योगीराज टाके यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन कुस्ती निवेदक युवराज सोलनकर आणि पोलीस पाटील गणेश पंडित यांनी केले. सायंकाळपर्यंत रंगलेल्या या आखाड्याने वातावरणात उत्साहाची लहर निर्माण केली.

शिंगवे हे कुस्तीप्रेमी गाव म्हणून ओळखले जाते. गावातील अनेक पैलवान दरवर्षी आखाड्यात उतरतात. यंदाही ग्रामस्थांनी विजेत्या व सहभागी पैलवानांवर बक्षिसांचा वर्षाव केला. प्रत्येक कुस्तीला मोठा प्रतिसाद मिळाला आणि गावकऱ्यांनी उत्साहात आखाड्याचा आनंद लुटला.

## महाराजस्व समाधान शिबिरात दाखल्यांचे वितरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर** : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत खेड तालुक्यातील वेताळे, वाडा व कुडे बु. मंडळातील गावांसाठी संयुक्त शिबिराचे आयोजन श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान, कडधे येथे करण्यात आले. या शिबिरात विविध शासकीय योजनांचा थेट लाभ देत नागरिकांना एकूण १३९५ दाखले वितरित करण्यात आले.

प्रांताधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. ‘शासन आपल्या दारी’ या संकल्पनेनुसार नागरिकांना विविध सेवांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला.

शिबिरात ई-फेरफार प्रणालीअंतर्गत ६९ फेरफार निर्गत करण्यात आले. तसेच ८-अ उतारे १२०, तर ७/१२ उतारे २५० वितरित करण्यात आले. कलम १५५ अंतर्गत १५ अर्ज प्राप्त झाले. रेशन कार्ड ६ कुटुंबांना वाटप करण्यात आले, तर ८ नवीन अर्ज स्वीकारण्यात आले. पीएम किसान योजनेत १७ लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत ४६ आणि श्रावणबाळ योजनेअंतर्गत ५१ लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. विद्यार्थ्यांना डोमिसाईल व जात प्रमाणपत्रे मिळून २९० दाखले देण्यात आले, तर उत्पन्नाचे १५५ दाखले वितरित करण्यात आले. एका अर्धन्यायिक प्रकरणात तडजोड करण्यात आली. एकूण ७७ नवीन अर्ज शिबिरात स्वीकारण्यात आले. ‘जिवंत ७/१२’ मोहिमेत ३७ वारस नोंदी मंजूर करून दुरुस्त उतारे वितरित करण्यात आले. आधार कार्ड अपडेटसाठी ८ लाभार्थ्यांना सेवा देण्यात आली. तसेच मौजे गुंडाळवाडी येथील पाणंद रस्ता ग्रामस्थ आणि महसूल प्रशासनाच्या प्रयत्नांतून खुला करण्यात आला. कृषी विभागाने ३३ शेतकऱ्यांना ‘महाविस्तार’ अॅप डाउनलोड करून देत फळबाग लागवडीबाबत मार्गदर्शन केले, तर महिला व बालविकास विभागाने विविध योजनांची माहिती दिली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्य समीरभाऊ सुपे, पंचायत समिती सदस्य दिनेश हांडे, तहसीलदार प्रशांत बेडसे पाटील, नायब तहसीलदार राम बिजे, निवडणूक नायब तहसीलदार मनिषा खैरे, मंडळ अधिकारी शितल शेवाळे, सविता घुमटकर, शांता बाणखिले यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी शिबिराद्वारे नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच इतर मंडळांमध्येही अशा शिबिरांचे आयोजन करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत सेवा पोहोचवावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळ अधिकारी शितल शेवाळे यांनी केले, तर आभार नायब तहसीलदार राम बिजे यांनी मानले.

## आळंदीत होणारा पाणीपुरवठा शुद्ध : मुख्याधिकारी खांडेकर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : आळंदी नगरपरिषदेच्या माध्यमातून होणारा पाणीपुरवठा पूर्णपणे शुद्ध आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन आळंदी नगरपरिषद प्रशासनातर्फे मुख्याधिकारी माधव खांडेकर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे आणि उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर यांनी केले आहे.

आळंदी शहरात जलशुद्धीकरण केंद्राच्या टाकीत मृतदेह आढळल्याच्या बातम्या काही प्रसारमाध्यमांनी चुकीच्या पद्धतीने दिल्याची बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने अधिकृत खुलासा केला आहे.

आळंदी नगरपरिषदेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे की, नागरिकांना होणारा पाणीपुरवठा नवीन जलशुद्धीकरण केंद्रातून होत असून ते पाणी पूर्णपणे शुद्ध व पिण्यायोग्य आहे.

आळंदी शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या सध्या कार्यरत असलेल्या कोणत्याही जलशुद्धीकरण टाकीत मृतदेह आढळलेला नाही. ज्या टाकीत मृतदेह सापडला आहे, ती नगरपरिषदेची अत्यंत जुनी व सध्या वापरात नसलेली बंद अवस्थेतील टाकी आहे. सध्याच्या पाणीपुरवठा यंत्रणेचा आणि जुन्या टाकीचा कोणताही संबंध नसून विद्यमान पाणीपुरवठा योजनेवर त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांना पुरवले जाणारे पाणी नवीन यंत्रणेतून पूर्णपणे शुद्ध, सुरक्षित व पिण्यायोग्य असल्याने पाण्याच्या गुणवत्तेबाबत कोणतीही शंका बाळगू नये, असेही प्रशासनाने नमूद केले आहे.

## उन्हाच्या झळांमध्ये कांदा काढणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : तीव्र उन्हाचा फटका शेतीच्या कामावर स्पष्टपणे जाणवत असून सध्या गावोगावी कांदा काढणी सुरू आहे. कडक उन्हाच्या झळा सहन करत मजुरांना काम करावे लागत आहे. उन्हापासून बचाव करण्यासाठी काही मजूर डोक्यावर चक्क छत्र्या बांधून काम करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

यंदा एप्रिल महिन्यातच उष्णतेची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दिवसभर उष्णतेच्या लाटा जाणवत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. सकाळी लवकर काम सुरू केले तरी नऊ वाजल्यानंतर उन्हाचा कडाका वाढू लागतो. दुपारच्या सुमारास तर परिस्थिती अधिकच कठीण होते. मात्र शेतीची कामे थांबवणे शक्य नसल्याने शेतकरी आणि मजूर उन्हातच काम करत आहेत.

सध्या बहुतांश गावांमध्ये कांदा काढणी सुरू असून मजुरांना उष्णतेतही हे काम करावे लागत आहे. काही मजुरांनी डोक्यावर रंगीबेरंगी छत्र्या बांधून काम करण्याचा उपाय शोधला आहे. तर काही मजूर टोपी घालून किंवा चेहरा कापडाने झाकून उन्हापासून संरक्षण करत आहेत. पाण्याच्या बाटल्या सोबत ठेवून वेळोवेळी पाणी पित काम सुरू ठेवले जात आहे. खुरपणी, पिकांची तोडणी यांसारखी कामे करतानाही विशेष काळजी घेतली जात आहे.

यंदा मजुरीचे दरही वाढले असून कांदा काढणीसाठी एकरी सुमारे १५ ते १६ हजार रुपये मजुरी द्यावी लागत आहे. कांदा काढणीसाठी येणाऱ्या मजुराला साधारण ४०० रुपये, तर वाहतुकीसाठी ५०० रुपये मजुरी द्यावी लागत आहे. एकीकडे कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळत नसताना दुसरीकडे वाढत्या मजुरीमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक ताण वाढत आहे. उष्णतेची लाट पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता असून, यामुळे शेतीची कामे करताना मजुरांना आणि शेतकऱ्यांना अधिक खबरदारी घ्यावी लागणार आहे.

### कायम सेवकांना श्रेणीनिहाय ७.५० टक्क्यांपासून ते २२ टक्क्यांपर्यंत वेतनवाढ

# राजगुरुनगर सहकारी बँकेचा वेतनवाढ करार संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर** : राजगुरुनगर सहकारी बँकेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा बहुप्रतीक्षित करार अखेर यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. बँक प्रशासन आणि बँक कर्मचारी संघ, पुणे यांच्यात झालेल्या या करारानुसार कायम सेवकांना श्रेणीनिहाय ७.५० टक्क्यांपासून ते २२ टक्क्यांपर्यंत वेतनवाढ मिळणार आहे. हा करार सन २०२५ ते २०२८ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी लागू राहणार आहे.

वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर हा करार कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे. या निर्णयामुळे बँकेवर सुमारे ३ कोटी ८० लाख रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार असला तरी कर्मचारी समाधान आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी तो महत्त्वाचा ठरेल, असे बँक प्रशासनाने स्पष्ट केले. या करारात मूळ वेतनासोबतच स्थिर महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता आणि वाहतूक भत्त्यातही वाढ करण्यात आली आहे. सेवाज्येष्ठतेनुसार वेतनवाढीची रचना करण्यात आल्याने दीर्घकाळ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना अधिक लाभ मिळणार आहे. करारावर बँकेच्या वतीने अध्यक्ष सागर पाटोळे, उपाध्यक्ष रामदास धनवटे, संचालक किरण आहेर, राजेंद्र वाळुंज, दत्तात्रय भेगडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शांताराम वाकचौरे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. कर्मचारी संघाच्या वतीने जनरल सेक्रेटरी सुनिल देसाई, अध्यक्ष गिरीश मेंगे, नितिन देशमुख, प्रमोद जाधव, संजय पायगुडे, भाऊसाहेब तुपे आणि सचिन कदम यांनी वाटाघाटीत सहभाग घेतला. यावेळी बँकेचे प्रतिनिधी धिरज वरूडे, अमोल आडवळे, प्रभावती गव्हाणे, नाथाराम नाणेकर, कल्याणी सुतार, महेश रौंधळ यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच संचालक राजेंद्र सांडभोर, विजया शिंदे, अॅड. राहुल तांबे, दिनेश ओसवाल, अविनाश कहाणे, सरव्यवस्थापक अमृत टाकळकर, उपसरव्यवस्थापक संजय ससाणे आणि सहाय्यक सरव्यवस्थापक शंकर कोल्हे यांचीही उपस्थिती होती. बँकेच्या व्यवसायवृद्धी आणि ग्राहकसेवा अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले. “बँकेच्या प्रगतीत आमचे कर्मचारी हेच खरे बळ आहे. त्यांच्या कष्ट आणि निष्ठेमुळेच बँक सातत्याने पुढे जात आहे. या करारातून त्यांच्या योगदानाची दखल घेतली असून, यामुळे कामाचा उत्साह वाढेल,” असे अध्यक्ष सागर पाटोळे यांनी सांगितले.

## महसूल शिबिराला अल्प प्रतिसाद; नियोजनावर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : कृषी विभागाच्या वतीने चार शेतकऱ्यांना ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले. त्याच वेळी राज्य शासनाच्या “छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर” अभियानांतर्गत निरगुडसर येथे आयोजित शिबिराला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. परिसरातील नागरिकांनी शिबिराकडे पाठ फिरवल्याचे चित्र दिसून आल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. शिबिरस्थळी वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले आणि तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे यांच्याशिवाय अन्य जबाबदार अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. याच दिवशी दुपारनंतर पंचायत समितीत अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आल्याने महसूल विभाग आणि पंचायत समिती यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी प्रांत कार्यालयात सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येणार असून, माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांना समज दिली जाईल, असा इशारा विवेक वळसे पाटील यांनी दिला.

## सारांश वृत्त

### हा स्त्रीशक्तीचा विश्वासघात : योगी

**लखनौ :** उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी २०२९ पर्यंत विधिमंडळात महिलांसाठी आरक्षण लागू करणे आणि लोकसभेच्या जागा वाढविणे यासाठी संविधान दुरुस्ती विधेयक पराभूत होणे म्हणजे देशातील महिला शक्तीचा विश्वासघात असल्याचे म्हटले आहे. २०२९ पर्यंत विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू करणे आणि लोकसभेच्या जागांची संख्या ८१६ पर्यंत वाढवण्याचे दुरुस्ती विधेयक शुक्रवारी पराभूत झाले.

### केंद्रातील सरकार अल्पमतात : ममता

**हावडा :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शनिवारी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आणि दावा केला की, २०२९ पासून विधानसभेत महिला आरक्षण लागू करण्यासाठी घटना दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात केंद्र सरकार अपयशी ठरल्याने भगवा पक्षाची "पतन" सुरू झाली. हावडा येथील उलुबेरिया आणि दक्षिण २४ परगणा येथील बारुईपूर येथे लागोपाठ मेळावे घेताना ममता यांनी सांगितले की संसदेतील घडामोडींनी हे दाखवून दिले आहे की भाजप आता बहुमत असलेला पक्ष नाही आणि केवळ दोन मित्रपक्षांच्या पाठिंब्याने सत्तेवर टिकून आहे.

### आसाममध्ये संयुक्त पूर मदत सराव

**गुवाहाटी :** लष्कर, एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि एसएसबी यांनी शनिवारी 'जल राहत' हा संयुक्त पूर मदत सराव आयोजित केला, ज्यामध्ये नैसर्गिक आपत्तींच्या आव्हानात्मक काळात आंतर-एजन्सी समन्वय आणि इंटरऑपरेबिलिटी दर्शविली गेली. भारतीय लष्कराच्या वतीने गजराज कॉर्प्सच्या रेड हॉर्न विभागाने आयआयटी गुवाहाटी येथे लष्कर, एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि एसएसबीच्या पूर मदत तुकड्या द्वारे आंतर-संस्था समन्वय आणि आपत्ती सज्जतेचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी हा सराव सुरू केला. यात पूर मदतकार्याची कार्यपद्धती, विविध संस्थांची भूमिका यांची भूमिका स्पष्ट करण्यात आली.

## होर्मुझ सामुद्रधुनीत तणाव वाढला

# इराणी बोटीचा तेलवाहू टँकरवर गोळीबार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** होर्मुझ सामुद्रधुनीत पुन्हा तणाव निर्माण झाला असून इराणच्या गनबोटने एका तेलवाहू टँकरवर गोळीबार केल्याची माहिती ब्रिटनच्या सागरी सुरक्षा यंत्रणेकडून देण्यात आली आहे. जहाजाचा मार्ग खुला ठेवण्याबाबतचे वचन मागे घेतल्यानंतर ही घटना घडल्याचे सांगितले जात आहे.

यूके मेरीटाइम ट्रेड ऑपरेशन्स सेंटरने दिलेल्या माहितीनुसार, ओमानच्या ईशान्येस सुमारे ३७ किलोमीटर अंतरावर इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्स कॉर्पच्या दोन गनबोट टँकरजवळ आल्या. कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांनी टँकरवर गोळीबार केला. मात्र, या घटनेत टँकर आणि त्यावरील चालक दल सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेनंतर परिसरातील हालचाली वाढल्या असून दोन भारतीय



जहाजांनी मार्ग बदलून परतल्याची माहिती जहाज-ट्रॅकिंग संस्थांनी दिली आहे. या जहाजांमध्ये सुमारे २० लाख बॅरल इराकी तेल वाहून नेणाऱ्या भारतीय ध्वजांकित सुपर टँकरचाही समावेश असल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, इराणकडून अमेरिकेविरुद्ध आक्रमक भूमिका कायम ठेवण्यात येत आहे. इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी इराणचे नौदल अमेरिकन सैन्याला प्रत्युत्तर देण्यास सज्ज असल्याचा इशारा दिला.

इराणच्या केंद्रीय लष्करी कमांडने सामुद्रधुनीवरील "कठोर नियंत्रण" पुन्हा सुरू करण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेने इराणच्या बंदरांवर नौदल नाकेबंदी कायम ठेवल्याचा आरोपही त्यांनी केला. या पार्श्वभूमीवर सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून काही जहाजांनी आपली ओळख बदलून किंवा मार्ग बदलून सुरक्षिततेचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

यापूर्वी लेबनॉनमध्ये इस्रायल आणि हिजबुल्ला यांच्यातील संघर्ष थांबवण्यासाठी झालेल्या युद्धविरामानंतर इराणने सामुद्रधुनी खुली केली होती. मात्र, आता पुन्हा परिस्थिती तणावपूर्ण बनली आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या बंदरांवरील नौदल नाकेबंदी कायम ठेवण्याचा संकेत दिला आहे. तात्पुरत्या युद्धविरामाचा कालावधी वाढवला जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दोन्ही देशांमध्ये कायमस्वरूपी करार होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली असली, तरी सध्याच्या घडामोडींमुळे संघर्ष पुन्हा तीव्र होण्याची भीती व्यक्त केली जात आहे

होर्मुझ सामुद्रधुनी ही जागतिक तेलपुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याने येथील तणावामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## गुजरातमध्ये हायटेक सायबर फसवणूक उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद :** गुजरात पोलिसांच्या सायबर सेंटर ऑफ एक्सलन्सने हायटेक इंटरस्टेट फसवणूक रॅकेटचा पर्दाफाश करत सुमारे २१० कोटी रुपयांच्या सायबर घोटाळ्याचा भंडाफोड केला आहे. या टोळीने देशभरातील १५ हून अधिक बँकांना लक्ष्य करून बँकिंग प्रणालीतील त्रुटींचा गैरवापर केला होता.

सायबर सेंटर ऑफ एक्सलन्सचे एसपी डॉ. राजदीपसिंह झाला यांनी सांगितले की, संघटित टोळ्या बँकिंग सॉफ्टवेअरमधील तांत्रिक कमकुवतपणाचा फायदा घेऊन मोठ्या प्रमाणावर फसवणूक करतात. या प्रकरणी आतापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली असून मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू आहे. तपासात वडोदरा येथील टोळीचा सहभाग उघड झाला आहे. होळीच्या सणाच्या काळात भावनगर जिल्हा सहकारी बँकेची प्रणाली हॅक करून एकाच रात्रीत सुमारे ७ कोटी रुपयांची चोरी करण्यात आल्याचे समोर आले आहे.

या टोळीचे जाळे आंध्र प्रदेश, गुजरात, हरियाणा, कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पंजाब अशा अनेक राज्यांमध्ये पसरलेले होते. तपासात ही टोळी किमान २७३ वेगवेगळ्या सायबर गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे उघड झाले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी बँकांच्या सीबीएस (कोअर बँकिंग सर्व्हिसेस) सॉफ्टवेअरमधील पळवाटांचा वापर केला. त्यांनी प्रथम निष्क्रिय किंवा कमी वापरात असलेली बँक खाती शोधून त्यांच्याशी जोडलेले मोबाइल क्रमांक बदलले आणि खात्यांवर नियंत्रण मिळवले. यानंतर प्रणालीत फेरफार करून सुमारे ७.३४ कोटी रुपयांचे व्हर्च्युअल क्रेडिट तयार करण्यात आले. ही रक्कम पुढे १३५ वेगवेगळ्या खात्यांमध्ये वळवण्यात आली. ही खाती सामान्य नागरिकांकडून वापण्यासाठी घेतली गेली होती. या कारवाईदरम्यान पोलिसांनी नऊ पासबुक, ३९ डेबिट कार्ड, १२ चेकबुक आणि चार मोबाइल फोन जप्त केले आहेत. तसेच सुमारे २.०४ कोटी रुपये गोठवण्यात आले असून निधीचा पुढील गैरवापर रोखण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## अभिषेक बॅनर्जींची केंद्रावर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**फरक्का :** रोड शो नंतर आयोजित सभेत तृणमूल काँग्रेसचे नेते अभिषेक बॅनर्जी यांनी भाजप आणि काँग्रेसवर जोरदार टीका करत तृणमूल काँग्रेसलाच मत देण्याचे आवाहन केले. तृणमूलला दिलेले मतच भाजपचा प्रभाव कमी करू शकते, असा दावा त्यांनी केला.

ते म्हणाले की, भाजप काँग्रेसला फोडण्याचा प्रयत्न करत आहे, तर तृणमूल काँग्रेसच जमिनीवर भाजपचा प्रभाव रोखत आहे. दुसरीकडे, तृणमूल काँग्रेसकडूनही आरोप करण्यात आला की गेल्या दोन वर्षांत विरोधी पक्षातील कोणताही खासदार किंवा प्रतिनिधी लोकांच्या प्रश्नांसाठी प्रभावीपणे उभा राहिला नाही.

या सभेत ममता बॅनर्जी यांनीही काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी, आम जनता उन्नयन पक्षाचे हुमायूं कबीर आणि आयएसएफचे नौशाद सिद्दीकी यांच्यावर टीका केली. त्यांनी या नेत्यांवर भाजपशी "मूक समझोता" केल्याचा आरोप केला.

मतदार यादीतून गरीब आणि अल्पसंख्याकांची नावे वगळण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत अभिषेक बॅनर्जी यांनी विरोधक समाजात फूट पाडत असल्याचे म्हटले. "हिंदू, मुस्लिम, शीख आणि ख्रिश्चन यांची दिशाभूल करू नका. जे फूट पाडतात त्यांना मतदानातून उत्तर द्या," असे ते म्हणाले. महिला आरक्षण विधेयकाबाबत बोलताना त्यांनी केंद्र सरकारवर टीका केली आणि परिसीमनाच्या माध्यमातून देशाचे विभाजन करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. "घटनेत जबरदस्तीने बदल होऊ देणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला. एनआरसी प्रक्रियेवरही त्यांनी भाष्य करत आसाममधील अनुभवाचा उल्लेख केला आणि पश्चिम बंगालमध्ये एनआरसी लागू होऊ देणार नसल्याची भूमिका पुन्हा स्पष्ट केली.

## प्रियांका गांधींचा केंद्रावर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** महिला आरक्षणासंदर्भातील संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक लोकसभेत मंजूर न झाल्यानंतर काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वढेरा यांनी या निकालाला 'लोकशाहीचा विजय' तर केंद्रासाठी 'काळा दिवस' असे संबोधले. पत्रकार परिषदेत त्यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली.

प्रियांका गांधी म्हणाल्या की, या पराभवामुळे विरोधकांच्या एकजुटीची ताकद आणि घटनात्मक तत्त्वांप्रती असलेली बांधिलकी स्पष्ट झाली. "काल जे घडले ते लोकशाहीचा मोठा विजय होता. संघराज्य रचनेत बदल करण्याचा प्रयत्न हाणून पाडण्यात आला," असे त्यांनी सांगितले. सरकार महिला आरक्षणाचा मुद्दा वापरून परिसीमनाशी संबंधित व्यापक राजकीय अजेंडा पुढे नेत असल्याचा आरोप त्यांनी केला. "सत्तेत टिकून राहण्यासाठी हा संपूर्ण डाव रचला गेला होता. आता परिसीमन झाले नाही तर २०२९ पूर्वी ते शक्य होणार नाही, अशी त्यांची भूमिका होती," असे त्या म्हणाल्या. सत्ताधारी पक्षाने राजकीय फायद्यासाठी कोणत्याही परिस्थितीत स्वतःला लाभदायक स्थितीत ठेवण्याचा प्रयत्न केला, असा आरोप करत त्या म्हणाल्या, "विधेयक मंजूर झाले असते तर ते स्वतःचा विजय मानले असते; आणि अपयशी ठरल्यावर विरोधकांना महिलाविरोधी ठरवण्याचा प्रयत्न केला गेला असता." महिलांच्या प्रश्नांवरील भाजपच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "हाथरससारख्या घटनांमध्ये काय झाले, ऑलिम्पिक पदक विजेत्यांच्या प्रकरणात काय झाले, हे देशाने पाहिले आहे," असे त्यांनी नमूद केले.

राहुल गांधी यांनीही स्पष्ट केले की काँग्रेसचा महिला आरक्षणाला विरोध नाही, तर ते परिसीमनाशी जोडण्यास विरोध आहे. "महिला आरक्षण कायदा २०२३ तात्काळ लागू करा. आवश्यक असल्यास किरकोळ दुरुस्त्या करा, पण महिलांना त्यांचे हक्क आता द्या," असे त्यांनी सरकारला आवाहन केले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या वक्तव्यावर टीका करत प्रियांका गांधी म्हणाल्या की, "काँग्रेस सत्तेत येणार नाही, असे म्हणणे ही त्यांची मानसिकता दर्शवते."

दरम्यान, लोकसभेत झालेल्या मतदानात विधेयकाच्या बाजूने २९८ तर विरोधात २३० मते पडली. आवश्यक दोन-तृतीयांश बहुमत न मिळाल्यामुळे हे विधेयक फेटाळले गेले. या विधेयकाद्वारे २०२९ पर्यंत महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्यासोबतच लोकसभेची संख्या ५४३ वरून ८१६ पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव होता.

## सागरी विम्यासाठी 'बीएमआय पूल'ला मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील संघर्षामुळे क्रूड तेल आणि गॅस पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने १२,९८० कोटी रुपयांच्या सार्वभौम हमीसह 'भारत मेरीटाईम इन्शुरन्स पूल' (बीएमआय पूल) स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. सागरी वाहतुकीसाठी परवडणारा आणि अखंडित विमा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

सरकारच्या माहितीनुसार, होर्मुझ सामुद्रधुनी परिसरातील तणावामुळे मालवाहू जहाजांची वाहतूक कमी झाली आहे. युद्धजन्य परिस्थिती आणि विमा निर्बंधांमुळे अनेक जहाजमालकांनी सेवा थांबवली असून काही विमा कंपन्यांनी जोखीम वाढल्याने कव्हरेज देण्यास टाळाटाळ सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर बीएमआय पूल भारतीय विमा कंपन्यांचा संयुक्त उपक्रम म्हणून कार्य करणार आहे. सार्वजनिक क्षेत्रातील पुनर्विमा कंपनी जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (जीआयसी री) या पूलाचे प्रशासक म्हणून काम पाहणार आहे. जीआयसी री सुमारे ४०० कोटी रुपये देणार असून, सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपन्यांकडून सुमारे २८० कोटी रुपये तर उर्वरित निधी खासगी विमा कंपन्या आणि तेल विपणन कंपन्यांकडून उभारला जाणार आहे.

माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, यामुळे सागरी विमा प्रीमियम किमान २५ टक्क्यांनी कमी होण्याची अपेक्षा आहे. परदेशी विमा कंपन्यांवरील, विशेषतः इंटरनॅशनल ग्रुप ऑफ पी अँड आय क्लब्सवरील अवलंबित्व कमी होईल. बीएमआय पूल भारतीय ध्वजांकित जहाजे, भारतीय नियंत्रणाखालील जहाजे तसेच भारतीय बंदरांमध्ये ये-जा करणाऱ्या जहाजांना विमा संरक्षण देणार आहे.

## १३१ वी घटनादुरुस्ती वरून राहुल गांधींचा आरोप

# केंद्र सरकार देशाशी खोटे बोलले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रानिपेट :** संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयकाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशाशी खोटे बोलल्याचा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. तामिळनाडूतील रानिपेट येथे निवडणूक सभेत ते बोलत होते.

राहुल गांधी म्हणाले की, महिला आरक्षणाच्या नावाखाली केंद्र सरकार देशाच्या निवडणूक नकाशात बदल करण्याचा आणि राज्यांना कमकुवत करण्याचा प्रयत्न करत होते. "ते महिलांच्या प्रतिनिधित्वासाठी विधेयक आणत असल्याचे सांगत होते, पण त्यामागे एक दुष्ट योजना लपली होती," असा आरोप त्यांनी केला.

भाजपप्रणित केंद्र सरकारचा हा प्रयत्न देशविरोधी असल्याचे सांगत त्यांनी म्हटले की, "प्रत्येक राज्याला मिळणाऱ्या लोकसभा जागांमध्ये बदल करून दक्षिण भारत, ईशान्य आणि लहान राज्यांचे प्रतिनिधित्व कमी करण्याचा डाव होता. हे राज्य संघटनांच्या विरोधात आहे."

राहुल गांधी यांनी दावा केला की, विरोधकांनी एकजुटीने उभे राहत हे विधेयक लोकसभेत पराभूत केले. भाजप परिसीमनाचा वापर राजकीय शस्त्र म्हणून करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. "आसाम आणि जम्मू-काश्मीरमध्ये आधीच बदल करण्यात आले आहेत आणि आता उर्वरित देशातही तसेच करण्याचा प्रयत्न सुरू आहे," असे ते म्हणाले. तामिळनाडूच्या संदर्भात बोलताना त्यांनी राज्याच्या इतिहास, संस्कृती आणि भाषेवर हल्ला करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. "तामिळ भाषा ही केवळ भाषा नाही, तर हजारो वर्षांची परंपरा आणि ओळख आहे. कोणतीही शक्ती तिला स्पर्श करू शकत नाही," असे त्यांनी ठामपणे सांगितले. यावेळी राहुल गांधी यांनी अण्णाद्रमुकवरही टीका करत पक्षावर भाजपचे नियंत्रण असल्याचा आरोप केला. "अण्णाद्रमुक हा केवळ मुखवटा असून त्यामागे भाजप आहे," असे ते म्हणाले. तसेच द्रमुकप्रमाणे राज्याच्या हितासाठी लढण्याची परंपरा अण्णाद्रमुकने गमावल्याचे त्यांनी नमूद केले. आरएसएस-भाजपवर सामाजिक न्यायाच्या विचारांना धक्का देण्याचा आरोप करत त्यांनी ई. व्ही. रामासामी पेरियार यांच्या विचारांचा उल्लेख केला आणि लोकांना या विरोधात उभे राहण्याचे आवाहन केले.

दरम्यान, काँग्रेस द्रमुकच्या नेतृत्वाखालील सेक्युलर प्रोग्रेसिव्ह आघाडीसोबत तामिळनाडूत २८ जागांवर निवडणूक लढवत आहे. राज्यातील विधानसभा निवडणुका २३ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात होणार आहेत.

## चुकीचे प्रतिज्ञापत्र; एसपींना न्यायालयात थांबवले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ :** हत्येच्या प्रकरणात चुकीच्या तथ्यांसह प्रतिज्ञापत्र दाखल केल्याबद्दल अलाहाबाद उच्च न्यायालय यांनी बस्ती जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक (एसपी) यांना न्यायालयाचा उठाव होईपर्यंत उपस्थित राहण्याचे निर्देश देत सावधगिरीचा इशारा दिला.

न्यायालयाने स्पष्ट केले की, जिल्ह्याचा प्रमुख म्हणून एसपी यांनी अधिनस्त अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीची खातरजमा करणे आवश्यक आहे. "प्रतिज्ञापत्र दाखल करताना अधिक दक्षता बाळगली पाहिजे," असे नमूद करत न्यायालयाने एसपींच्या माफीनाम्यावर सौम्य दृष्टीकोन घेतला, मात्र भविष्यात चूक टाळण्याची ताकीद दिली. प्रकरण सप्टेंबर २०२५ मधील आहे. बस्ती जिल्ह्यातील वाल्टरगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका तरुणीचा मृतदेह शेतात आढळला होता. सुरुवातीला तिच्यावर जड वस्तूने हल्ला झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला; मात्र शवविच्छेदन अहवालात गंभीर दुखापतीचे ठोस पुरावे आढळले नाहीत. या प्रकरणी मनजीत कुमार आणि तीन अज्ञात व्यक्तींवर आरोप करण्यात आले. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, आरोपी तरुणीवर लग्नासाठी दबाव टाकत होते. तिने नकार दिल्यानंतर तिची हत्या केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात पोलिसांनी १७ दिवसांनंतर एफआयआर दाखल केला होता.

आरोपींनी उच्च न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल केला. सुनावणीदरम्यान न्यायालयाने पोलिसांकडून पॅरा-निहाय अहवाल मागवला होता; मात्र अहवाल सादर करण्यात झालेल्या विलंबावर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. वाल्टरगंजचे एसएचओ उपेंद्र सिंह तसेच तपास अधिकारी मनोज यादव यांनाही समन्स बजावण्यात आले. यानंतर फिर्यादी अधिकारी राजीव कुमार यांनाही न्यायालयात हजर राहण्यास सांगण्यात आले. पुढे ७ एप्रिल २०२६ रोजी एसपी यशवीर सिंह यांनाही समन्स बजावण्यात आले होते. १६ एप्रिल रोजी एसपी आणि संबंधित अधिकारी न्यायालयात हजर झाले. न्यायालयाने पोलिसांच्या निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. एसपी यशवीर सिंह यांनी आपली चूक मान्य करत बिनशर्त माफी मागितली.

## काँग्रेसने दक्षिणेचा विश्वासघात केला

**नवी दिल्ली :** २०२६ च्या जनगणनेनंतर जागांच्या प्रमाणात कलम ८१ गोठवल्यानंतर दक्षिणेकडील राज्यांचे संरक्षण करण्यासाठी असलेल्या संविधान (१३१ व्या दुरुस्ती) विधेयकाची "हत्या" केल्यामुळे कॉग्रेस आणि इंडिया आघाडीने दक्षिणेचा विश्वासघात केला आहे, असा आरोप केंद्रीय मंत्री बंडी संजय कुमार यांनी शनिवारी केला. काँग्रेस आणि त्यांच्या इंडिया आघाडीने संसदेत त्यांनी हे विधेयक रद्द केले, असा आरोप केंद्रीय गृह राज्यमंत्री संजय कुमार यांनी सांगितले.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शनिवारी झालेल्या बैठकीत केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) २ टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्क्यांपर्यंत वाढला आहे.

या वाढीचा लाभ पेन्शनधारकांनाही मिळणार असून त्यांच्यासाठीच्या डीआर ही २ टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे डीआर देखील ५८ टक्क्यांवरून ६० टक्क्यांपर्यंत वाढला आहे. महागाई भत्ता हा सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांना वाढत्या महागाईपासून संरक्षण देण्यासाठी दिला जाणारा महत्त्वाचा घटक आहे. हा भत्ता मूळ वेतनाच्या टक्केवारीच्या स्वरूपात दिला जातो आणि कर्मचाऱ्यांची क्रयशक्ती टिकवून ठेवण्यासाठी त्यात नियमित सुधारणा केली जाते.

महागाई भत्त्यात साधारणपणे वर्षातून दोनदा जानेवारी आणि जुलैमध्ये बदल केला जातो. श्रम मंत्रालयाच्या अखत्यारीतील कामगार ब्युरोने जाहीर केलेल्या औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकाच्या आधारे ही वाढ निश्चित केली जाते. यापूर्वी ऑक्टोबर २०२५ मध्ये पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने महागाई भत्त्यात ३ टक्क्यांची वाढ करून तो ५५ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत नेला होता. या निर्णयाचा लाभ सुमारे ४९.१९ लाख कर्मचारी आणि ६८.७२ लाख पेन्शनधारकांना झाला होता.

## एआयच्या युगात न्यायिक स्वातंत्र्याला नवे आव्हान

# अल्गोरिदमिक प्रभावापासूनही मुक्तता हवी : न्यायमूर्ती नागरत्ना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** समकालीन काळात न्यायिक स्वातंत्र्याची व्याख्या केवळ बाह्य दबावांपासून मुक्त राहण्यापुरती मर्यादित नसून, ती आता 'अल्गोरिदमिक प्रभावापासून' मुक्त असण्याचीही गरज आहे, असे स्पष्ट मत बी. व्ही. नागरत्ना यांनी व्यक्त केले. कर्नाटक राज्य न्यायिक अधिकारी संघटनेच्या वतीने आयोजित "कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात न्यायव्यवस्थेची पुनर्कल्पना" या विषयावरील २२ व्या द्वैवार्षिक परिषदेत त्या बोलत होत्या.



न्यायालयीन निर्णय प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर वाढत असताना त्यावर अति अवलंबून राहण्याबाबत त्यांनी स्पष्ट इशारा दिला. तंत्रज्ञान हे सहाय्यक साधन म्हणून उपयुक्त ठरू शकते; मात्र मानवी निर्णयक्षमता कधीही त्याची जागा घेऊ शकत नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

"कायद्याचे राज्य हेच आपल्या न्यायव्यवस्थेचे मूलभूत तत्त्व आहे. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी या तत्त्वाला धक्का बसता कामा नये," असे त्या म्हणाल्या. कायद्याचे राज्य ही केवळ तांत्रिक संकल्पना नसून ती नैतिक आणि घटनात्मक बांधिलकी आहे, जी न्यायव्यवस्थेत निष्पक्षता, समानता आणि उत्तरदायित्व टिकवून ठेवते, असे त्यांनी स्पष्ट केले.

न्यायालयीन प्रक्रियेत एआयचा वापर 'परिघीय' पातळीवरच राहावा, असा आग्रह त्यांनी धरला. "निर्णयाचा केंद्रबिंदू नेहमी मानवी विचार, कायदेशीर तर्क आणि घटनात्मक मूल्येच असायला हवेत. तंत्रज्ञानाने निर्णय प्रक्रियेवर नियंत्रण मिळवले, तर न्यायसंस्था कमकुवत होण्याचा धोका आहे," असे त्यांनी नमूद केले.

एआय प्रणालींवर अति अवलंबून राहिल्यास न्यायालयीन विचारप्रक्रियेवर सूक्ष्म परिणाम होऊ शकतो आणि मानवी स्वायत्ततेलाही धोका निर्माण होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. "एआय माहिती प्रक्रिया आणि निर्णय घेण्याच्या पद्धतीवर प्रभाव टाकते. त्यामुळे न्यायिक स्वातंत्र्याची व्याख्या आता अल्गोरिदमिक प्रभावापासून मुक्ततेपर्यंत विस्तारली पाहिजे," असे त्या म्हणाल्या.

तंत्रज्ञानामुळे कार्यक्षमता वाढू शकते, विशेषतः कायदेशीर सहाय्य प्रणालींमध्ये त्याचा उपयोग होऊ शकतो, हे मान्य करतानाच त्यांनी न्याय केवळ वेग किंवा कार्यक्षमतेपुरता मर्यादित करता येत नाही, असेही स्पष्ट केले. "न्यायामध्ये सहानुभूती, करुणा, संदर्भ आणि मानवी जीवनाची सखोल समज आवश्यक असते. कोणतेही यंत्र हे पूर्णपणे पुनरुत्पादित करू शकत नाही," असे त्या म्हणाल्या.

न्यायप्रक्रियेत झालेल्या चुका नागरिकांच्या जीवन, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेवर गंभीर परिणाम करू शकतात, याची जाणीव ठेवून एआयचा वापर अत्यंत जबाबदारीने करावा, असेही त्यांनी सांगितले. एकूणच, कृत्रिम बुद्धिमत्ता न्यायव्यवस्थेला पूरक ठरू शकते; मात्र अंतिम निर्णयाची जबाबदारी ही नेहमी न्यायाधीशांकडेच राहिली पाहिजे, असा ठाम निष्कर्ष न्यायमूर्ती नागरत्ना यांनी मांडला.